# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.03.2025** **वार-मंगळवार**

---

**स्मार्टसिटी**

केंद्र सरकारने स्मार्ट सिटी प्रकल्प अधिकृतपणे बंद केला आहे. मात्र, या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेली पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी सुरूच ठेवण्यात येणार आहे. या कंपनीअंतर्गत नेमण्यात आलेले 20 कर्मचारीही कायम राहणार असून, त्यांची जबाबदारी पुणे महानगरपालिका घेणार आहे. यासंदर्भात केंद्र सरकारकडून काल ऑनलाइन बैठक घेण्यात आली. त्यानंतर पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी आज ही माहिती दिली. केंद्र सरकार लवकरच 'अर्बन डिजिटल मिशन' सुरू करणार आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी ही कंपनी उपयुक्त ठरणार आहे.

**थॅलेसेमिया**

थॅलेसेमिया या रक्ताच्या गंभीर आजारावर रुग्णांचे उपचार व्यवस्थापन, वाहक शोध आणि समाजप्रबोधन या त्रिसूत्रीवर काम करण्यासाठी ‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती’ आणि ‘जनकल्याण रक्त केंद्र साखळी’ संयुक्तपणे प्रयत्न करणार आहे; त्याचा प्रारंभ पुण्यातून करण्यात आला. पुण्यातील ‘सेवा भवन’इथं जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून या उपक्रमासंबंधीची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य भय्याजी जोशी, ‘जनकल्याण समिती‘चे अध्यक्ष डॉ. अजित मराठे, ‘जनकल्याण रक्त केंद्र साखळी’चे अध्यक्ष डॉ. दिलीप वाणी आणि राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सहाय्यक संचालक डॉ. महेंद्र केंद्रे यांची कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती.

**डायलिसिस**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव रुग्णालयात आत्तापर्यंत मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या जवळपास दहा हजार रुग्णांना डायलिसिस सेवेचा लाभ मिळाला आहे. महापालिकेने 2022मध्ये या रुग्णालयात डायलिसिस विभाग सुरु केला आहे.

**महाबीज**
विविध पिकं, वाणांचं संशोधन करून त्याच्या विपणनावर लक्ष केंद्रित करणं आवश्यक आहे, अशी अपेक्षा राज्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव आणि महाबीजचे अध्यक्ष विकास चंद्र रस्तोगी यांनी व्यक्त केली. महाबीजच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण होत आहेत, त्यानिमित्त पुण्यात एका बैठकीत महाबीजच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचं अनावरण रस्तोगी यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कृषी आयुक्त सुरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर आदी उपस्थित होते.

**पुणे परिवहन**
सरकारी, निमसरकारी, खासगी कंपनीत किंवा संघटीत क्षेत्रासह इतर कोणत्याही संस्थेत नोकरी करत असलेल्या व्यक्तीने ऑटोरिक्षा परवाना घेतला असेल, तर त्यांनी तो तत्काळ स्वेच्छेने जमा करावा. हे परवाने जमा करण्यासाठी येत्या 30 एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे, असं पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी सांगितलं. मुदतीनंतरही संबंधित व्यक्तींनी ऑटोरिक्षा परवाना जमा केला नसल्याचं निदर्शनास आलं तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशाराही पुणे प्रादेशिक परिवहन विभागानं दिला आहे.

**कौशल्य रोजगार**
पुणे शहर आणि जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांना विविध प्रकारचं कौशल्य देऊन रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या पंतप्रधान आंतरवासिता योजनेला 15 एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती पुणे महापालिकेच्या समाज विकास विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त नितीन उदास यांनी दिली. केंद्र सरकारच्या कॉपोरेट मंत्रालयाने सुरू केलेल्या या योजनेत 18 प्रकारच्या क्षेत्रामध्ये प्रशिक्षण दिलं जातं. त्यासाठी 500 कंपन्यांसमवेत करार करण्यात आला असून, प्रत्येक शिकाऊ उमेदवाराला वर्षभरात 66 हजार रुपये पाठ्यवृत्ती दिली जाणार आहे.

**पेपर फुटी**
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे  शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये घेतल्या जाणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचणी अर्थात पॅट परीक्षेतील इयत्ता नववीची प्रश्नपत्रिका फुटल्या प्रकरणी परिषदेच्या वतीने युट्यूबवरील 21 वाहिन्यांविरोधात पोलिसात तक्रार दाखल केली आहे. युट्यूबवरील वाहिन्यांवर प्रश्नपत्रिका दाखवून ती सोडवण्याबाबत मार्गदर्शन करणाऱ्या चित्रफिती प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यामुळे परीक्षेच्या गोपनीयतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

**दुचाकी रॅली**

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या वतीने विश्व नवकार महामंत्र दिवसाच्या अनुषंगानं उद्या नवकार महामंत्र सामूहिक जप सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याबाबत जनजागृती करण्यासाठी आज पुण्यात दुचाकी फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. या उपक्रमाला सर्वधर्मीय नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. उद्या सकाळी 7 ते साडे नऊ या वेळेत एस. पी. महाविद्यालयाच्या मैदानावर नवकार महामंत्र सामूहिक जप करण्यात येईल; यात देश परदेशातील नागरिक एकत्रितपणे नवकार महामंत्र पठण करत विश्वशांती आणि विश्वकल्याणासाठी प्रार्थना करणार आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उन्हाची काहिली वाढली असून कमाल तापमान 41 अंश तर किमान तापमान 21 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही कमाल तापमान साधारण 40 अंशाच्या आजच्या सारखंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**